सकाळ



गडहिंग्लज : प्रा. स्वाती कोरी यांच्या हस्ते रवळनाथचे पहिले डेबिट कार्ड शिल्पा ठोकडे यांना वितरित झाले. शेजारी एम. एल. चौगुले, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार.

# 'रवळनाथ'च्या डेबिट कार्ड वितरणास प्रारंभ

गडहिंग्लज, ता. १० : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटीच्या डेबिट कार्ड वितरणास प्रारंभ झाला. नगराध्यक्षा प्रा. स्वाती कोरी यांच्या हस्ते संस्थेच्या प्रधान कार्यालयात हा कार्यक्रम झाला. कागलच्या तहसीलदार व संस्थेच्या सभासद शिल्पा ठोकडे यांना प्रा. कोरी यांच्या हस्ते पहिले डेबिट कार्डचे वितरण झाले. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

प्रा. कोरी म्हणाल्या, 'नवे तंत्रज्ञान व आधुनिकतेचा ध्यास, पारदर्शकता, सभासद व ठेवीदारांचा विश्वास यामुळेच रवळनाथची चौफेर प्रगती झाली आहे.' तहसीलदार ठोकडे म्हणाल्या, 'रवळनाथची तत्पर सेवा आणि सामजिक बांधिलकी कौतुकास्पद आहे.' श्री. चौगुले म्हणाले, 'डेबिट कार्डच्या माध्यमातून संस्था चोवीस तास सभासद व ग्राहकांच्या बरोबर राहणार आहे. अधिकाधिक ग्राहकांनी या सेवेचा लाभ घ्यावा.' यावेळी संचालिका मीना रिंगणे, गौरी बेळगुद्री, अंजली हजारे, रेखा पोतदार, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, उमा तोरगल्ली, प्रा. विजय आरबोळे, डॉ. संजय चौगुले, सीईओ डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड उपस्थित होते.

पुढारी



**गडहिंग्लज : नगराध्यक्षा स्वाती कोरी यांच्या हस्ते 'रवळनाथ'चे पहिले डेबिट कार्ड कागलच्या तहसीलदार व संस्थेच्या सभासद शिल्पा ठोकडे यांना वितरित करण्यात आले. शेजारी एम. एल. चौगुले, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार आदी मान्यवर.**

# 'रवळनाथ'च्या डेबिट कार्ड वितरणास प्रारंभ

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथील श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीच्या डेबिट कार्ड वितरणास महिला दिनी प्रारंभ झाला. गडहिंग्लजच्या नगराध्यक्षा स्वाती कोरी यांच्या हस्ते संस्थेच्या प्रधान कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. कागलच्या तहसीलदार व संस्थेच्या सभासद श्रीमती शिल्पा ठोकडे यांना नगराध्यक्षा कोरी यांच्या हस्ते पहिले डेबिट कार्ड प्रदान करण्यात आले.

संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. संचालिका मीना रिंगणे यांनी स्वागत केले. संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजय आरबोळे डॉ. संजय चौगुले, सीईओ डी. के. मायदेव, प्रशासनाधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, संचालिका रेखा पोतदार व सभासद, कर्मचारी उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Mar 11, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in